**वादीतर्फे साक्षीदार क्र.०१**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव - लता श्रीहरी बाळबुधे

**<u>सरतपास शपथेवर वादी तर्फे श्री एल.आर. मांडवकर यांच्या मार्फत सुरू.</u>**

**१.** माझे शपथपत्र **नि. क्र.१३** मी सांगिल्याप्रमाणे तयार केलेले नाही. साक्षीदार पुन्हा सांगते की, **नि. क्र.१३** मी सांगितल्याप्रमाणे तयार केलेले आहे व त्यामधील मजकुर मी सांगितलेला आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास यापुर्वीस **नि. क्र.१३** देण्यात आला आहे. कमलाबाई माझी आई होती. माझी आई कमलाबाई तीची शेती मौजा वडेगाव येथे गट नं. २५ मध्ये होती. त्यांचा सातबारा उताराची प्रमाणीत प्रत मी अभिलेंकावर दाखल केली त्यास **नि. क्र.१४** देण्यात आला. आता मला गट नं. २५ मधील शेतीचा आठ अ ची सत्यप्रत अभिलेखांवर दाखल केलेली दाखवली त्यास **नि. क्र.१५** देण्यात आला. मी अभिलेंखावर प्रतिवादीच्या नावाचा गट नं. २५ सातबाराच्या उता-याची सत्यप्रत अभिलेंखावर दाखल केली त्यास **नि. क्र.१६** देण्यात आला. तसेच सदर गट नं. २५ चा आठ अ ची दि. ११/०७/२०२२ ची सत्य प्रत दाखल केली त्यास **नि. क्र.१७** देण्यात आला. मी अभिलेंखावर फेरफार नोंद क्र. ५५८ ची सत्यप्रत दाखल केली त्यास **नि. क्र.१८** देण्यात आला.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>प्रतिवादी तर्फे श्री. जी. आर. हुंगे यांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि .०८.०४.२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह दि.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड